| | |
|---|---|
| MHAK070003332018 | **<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २५/२०१८ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र.२५ वर आदेश</u>**<br>नबीला फिरदोस वि. कोणीही नाही.<br>(दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४) |

**१.** प्रस्तुत प्रकरण अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केले आहे. सदर अर्जामध्ये हरकतदार इब्राहीम साहेब हुसेन साहेब यांनी असे कथन केले आहे की, दिनांक २८.०९.२०१८ रोजी प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांनी त्यांची हरकत सविस्तरपणे दाखल केलेली असून त्यांचा मयत मुलगा मोहम्मद नदीम याला अर्जदार हिचे शिवाय मुस्लीम कायद्यानुसार इतर कायदेशिर वारस सुध्दा आहेत, परंतु अर्जदार हिने इतर वारसदारांना गैरअर्जदार म्हणून प्रस्तुत अर्जामध्ये पक्षकार केलेले नाही. मयत मोहम्मद नदीम याचे वारस ठरविण्याकरीता त्यांना गैरअर्जदार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करावा अशी विनंती हरकतदार इब्राहीम साहेब हुसेन साहेब यांनी केली आहे.

२. अर्जदारतर्फे त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करून असे कथन करण्यात आले आहे की, हरकतदार यांना कोणताही कायदेशिर अधिकार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला. तसेच दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. मुळ अर्ज (नि.क्र.१) आणि दि. २८.०९.२०१८ रोजी हरकतदार यांनी दाखल केलेली हरकत (नि.क्र.९) याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की, अर्जदार हीने मयताची पत्नी या नात्याने अर्ज सादर केलेला असून हरकतदार यांनी मयताचे वडील या नात्याने हरकत दाखल केलेली आहे. हरकतदार हे मयत मोहम्मद नदीम याचे वडील असल्यामुळे मुळ अर्जाच्या गुणदोषांवर निर्णय करण्याकरीता हरकतदार यांना मुळ अर्जामध्ये गैरअर्जदार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज नि.क्र.२५ मंजुर करण्यात येत आहे.

२. हरकतदार इब्राहीम साहेब हुसेन साहेब यांना मुळ अर्जामध्ये गैरअर्जदार म्हणून समाविष्ट करण्यात यावे.

३. मुळ अर्जदार यांनी प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांचे आत पुर्ण करुन अर्जाची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला)

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2024.11.25 17:48:37 +0530

**दिनांक : २५/११/२०२४.**
**ठिकाणः बाळापूर**

**( विष्णु द. गिते )**
**सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),**
**बाळापूर.**

<table>
<tr><td colspan="3">I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order.</td></tr>
<tr><td>Name of the Court</td><td>:-</td><td>Shri. Vishnu D. Gite<br>Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur</td></tr>
<tr><td>Name of the Stenographer</td><td>:-</td><td>Ajay N. Hande</td></tr>
<tr><td>Date of Decision</td><td>:-</td><td>25/11/2024</td></tr>
<tr><td>Order signed by P.O on</td><td>:-</td><td>25/11/2024</td></tr>
<tr><td>Order uploaded on</td><td>:-</td><td>25/11/2024</td></tr>
</table>